जावक क्र प्राशिस/शाबास/५००/२०१५
प्राथमिक शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे -१
दिनांक - २१.०७.२०१५

प्रति,

१ शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, सर्व
२ शिक्षणाधिकारी, महानगरपालिका सर्व
३ प्रशासन अधिकारी, नगरपालिका सर्व

**विषय:- <u>शाळाबाह्य बालकांच्या दिनांक ४ जुलै, २०१५ रोजी च्या सर्वेक्षणात समाविष्ट होऊ न शकलेल्या बालकांचे सर्वेक्षण करण्याबाबत.</u>**

**संदर्भ** - १. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे शासन निर्णय क्र ओएससी ४४१५/(१०२/१५)-एस डी ४, दिनांक २०.०५.२०१५
२. संचालनालयाचे पत्र दिनांक २६.५.२०१५.

राज्यातील शाळाबाहय बालकांचे दिनांक ४ जुलै २०१५ रोजी एकदिवशीय राज्यव्यापी सर्वेक्षण करण्याचा निर्णय शासनाने संदर्भ क्रमांक १ अन्वये घेतला होता. त्या अनुषंगाने दिनांक ४ जुलै २०१५ रोजी राज्यभर करावयाच्या एकदिवशीय सर्वेक्षणाबाबतच्या सूचना संचालनालयाचे संदर्भ क्रमांक २ अन्वये देण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार राज्यभर एकदिवशीय सर्वेक्षण करण्यात आले. तथापि या सर्वेक्षणात आढळून आलेल्यापेक्षा जास्त बालके शाळाबाहय आहेत अशा प्रकारचे निवेदन दगडखाण कामगार, उसतोडणी कामगार, विटभट्टी कामगार या शाळाबाहय मुलांसाठी काम करणाऱ्या विविध संघटनांनी दिनांक १३.७.२०१५ रोजी प्राथमिक शिक्षण संचालनालयास सादर केलेले आहे. या संघटनांनी निवेदनात दिलेली वस्तुस्थिती पडताळणी करण्याच्या दृष्टीने दिनांक ४ जुलै २०१५ रोजी केलेल्या सर्वेक्षणात राहून गेलेल्या शाळाबाहय बालकांचे सर्वेक्षण करण्याबाबत शासनाने सूचित केले आहे. त्यानुसार पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. दिनांक ४ जुलै २०१५ रोजी केलेल्या सर्वेक्षणात राहून गेलेल्या शाळाबाहय बालकांचे सर्वेक्षण आजपासून सुरु करावे व दिनांक ३१ जुलै २०१५ पूर्वी पूर्ण करण्यात यावे.
२. यावेळी सर्वेक्षण शिक्षण खात्यामार्फत दैनंदिन कामकाज सांभाळून पूर्ण करावे.
३. या सर्वेक्षणामध्ये परगावी गेलेली, स्थलांतरित झालेली, राहून गेलेली अशा सर्व बालकांचे सर्वेक्षण करण्यात यावे.
४. या सर्वेक्षणासाठी स्वयंसेवी संघटनांचे सहकार्य घेण्यात यावे. स्वयंसेवी संघटनांनी शाळाबाहय बालकांची यादी दिल्यास त्यांचीही पडताळणी करुन सर्वेक्षणाचा फॉर्म करावा व त्याना जवळच्या शाळेमध्ये प्रवेश देण्यात यावा.
५. ज्या परिसरामध्ये शाळाबाहय बालके आढळून येण्याची शक्यता जास्त आहे परंतु यापूर्वीच्या सर्वेक्षणामध्ये सदर आकडेवारीमध्ये खूपच तफावत असल्यास अशा परिसरांवर अधिक लक्ष केंद्रित करावे. व त्या परिसरातील शाळाबाहय बालकांचे १०० टक्के सर्वेक्षण होईल अशा दृष्टीने कार्यवाही करावी.

Scanned by CamScanner

६. दिनांक ३१ जुलै २०१५ अखेर आढळून आलेल्या शाळाबाहय बालकांची माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेकडे दिनांक ०३ ऑगस्ट २०१५ पर्यन्त सादर करण्यात यावी.

७. दिनांक ४ जुलै २०१५ रोजी केलेल्या सर्वेक्षणामध्ये, आता करण्यात येणाऱ्या सर्वेक्षणामध्ये आढळून आलेल्या बालकांचे तसेच पूर्वीचे आधारकार्ड बनविण्याचे शिल्लक असलेल्या बालकांची यादी आधारकार्ड काढण्याच्या दृष्टीने सदर याद्यांसह तहसिल कार्यालयाशी संपर्क साधण्याबाबत सर्व मुख्याध्यापकांना सूचना देण्यात याव्यात. सर्व जिल्हाधिकाऱ्यांना तशी विनंती करण्यात आली आहे.

८. सर्वेक्षणामध्ये आढळून आलेल्या सर्व बालकांची यादी सर्व संचालकांना ई-मेलवर पाठविण्यात यावी व ती यादी आपल्या वेबसाईटवर टाकावी.

९. सर्वेक्षणामध्ये आढळून आलेल्या बालकांना शाळेमध्ये दाखल केल्यानंतर ते शाळेत नियमित येणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने त्या शाळेतील शिक्षक, केंद्र प्रमुख, विस्तार अधिकारी तसेच त्या गावातील बचत गटाचे कार्यकर्ते, स्वयंसेवी संघटनांचे कार्यकर्ते ,शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य यांना या बालकांना दत्तक घेण्याबाबत सूचित करावे.

१०. शाळाबाहय बालकांचा अभ्यास करण्याबाबत यापूर्वी सूचना देण्यात आलेल्या होत्या, त्यानुसार case study केलेल्या अधिकाऱ्यांनी शाळाबाहय बालकांची जबाबदारी स्वीकारावी. अशा अधिकाऱ्यांचे नाव व त्यांनी जबाबदारी स्वीकारलेल्या बालकांची नावे व पत्ते आपल्या वेबसाईटवर टाकावीत.

उपरोक्त कालावधीमध्ये करण्यात आलेल्या सर्वेक्षणानंतर मा.आयुक्त शिक्षण यांचे कार्यालय व प्राथमिक शिक्षण संचालनालय यांच्या स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या पथकांमार्फत रॅन्डम पध्दतीने शाळाबाहय बालकांची तपासणी करण्यात येणार आहे. त्या तपासणी पथकास एकसुध्दा शाळाबाहय मूल दिसणार नाही या बेताने कार्य करावे.

उपरोक्त बाब विचारात घेऊन सर्व जिल्हयांनी आपआपल्या स्तरावर पुनर्तपासणी करुन घेतल्यास अधिक वास्तववादी सर्वेक्षण होईल व एकही विद्यार्थी शाळाबाहय दिसून येणार नाही.

(डॉ. पुरुषोत्तम भापकर,भा.प्र.से.)
आयुक्त शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत: माहितीस्तव सादर.

१. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२. विभागीय आयुक्त, सर्व, महाराष्ट्र राज्य.
३. खाजगी सचिव, मा.मंत्री महोदय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मुंबई- ३२.
४. आयुक्त महानगरपालिका, सर्व, महाराष्ट्र राज्य.
५. जिल्हा पोलीस अधीक्षक, सर्व, महाराष्ट्र राज्य.
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा, महाराष्ट्र राज्य.

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी.

विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व

२/- विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी शिक्षणाधिकारी यांचेकडून प्राप्त झालेली माहिती एकत्रित करुन विभागाचा अहवाल दिनांक दिनांक ५ ऑगस्ट २०१५ रोजी प्राथमिक शिक्षण संचालनालयास सादर करावा.

प्रति,
सर्व मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका
मनपा नागपूर

उपरोक्त पत्रातील निर्देशाप्रमाणे शाळाबाह्य विद्यार्थ्यांचा शोध आपण कार्यालयीन वेळेव्यतिरिक्त वर्षभर घ्यावयाचा आहे. परिसरात मिळालेले शाळाबाह्य विद्यार्थी नजीकच्या शाळेत दाखल करून याबाबतचा अहवाल सर्व शिक्षा अभियान कार्यालयात सादर करावा.

शिक्षणाधिकारी
मनपा नागपूर

Scanned by CamScanner